

# विध्वंसक

एड्रियन एबेन्स सोबत डेयान अँडोव्ह

# विध्वंसक

एड्रियन एबेन्स सोबत डेयान अँडोव्ह

Printed by

MARANATHA
MEDIA
maranathamedia.com

September 2025

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे.
तसेच पुनर्वाचनासाठी भाऊ जॉनी साळवी ह्यांनी मदत केली आहे.

स्तोत्र ७८:४३-४८ मध्ये इस्राएली लोकांना गुलामगिरीतून मुक्त करण्यापूर्वी मिसरावर आलेल्या पीडांचे वर्णन केले आहे. आपण वाचतो:

त्याने मिसर देशात आपली चिन्हे, सोअनाच्या पटांगणावर आपली अद्‌भुत कृत्ये दाखवली, तो दिवस त्यांनी आठवला नाही. त्याने त्यांच्या नद्यांच्या पाण्याचे रक्त केले, म्हणून त्यांचे वाहते पाणी त्यांच्याने पिववेना. त्याने त्यांच्यावर माश्यांचे थवेच्या थवे पाठवले; त्या माश्यांनी त्यांना ग्रासून टाकले; त्याने बेडूक पाठवले, त्या बेडकांनी त्यांचे सर्वकाही नासून टाकले. त्याने त्यांच्या शेतातल्या उत्पन्नावर सुरवंट व त्यांच्या श्रमफलावर टोळ पडू दिले. त्याने गारांनी त्याच्या द्राक्षवेलांचा व बर्फाने त्यांच्या उंबराच्या झाडांचा नाश केला. त्याने त्यांची गुरेढोरे गारांच्या, व जनावरे विजांच्या हवाली केली. स्तोत्र ७८:४३-४८

आता कृपया ४९ वे वचन काळजीपूर्वक वाचा:

त्याने त्यांच्यावर आपला कोपाग्नी, क्रोध, रोष व संकट ह्या अनिष्टकारक दूतांची स्वारी सोडली. स्तोत्र ७८:४९

इथे आपल्याला सांगितले जाते की मिसरावर आलेल्या साथींमध्ये वाईट देवदूत सहभागी होते. याचा एकच अर्थ होतो ते दुष्ट आत्मे होते. कारण स्वर्गात असे वाईट देवदूत नाहीत जे देवाच्या इच्छेचे आनंदाने पालन करतात.

आता आपण पाहू शकतो का की मिसरावर साथ आली त्या वेळी हे वाईट देवदूत काय करत होते? चला निर्गम १२:१२ वाचूया:

कारण ह्या रात्री मिसर देशात फिरून त्यातील मनुष्य व पशू ह्या सर्वांचे प्रथमजन्मलेले मी मारून टाकीन आणि मिसर देशातील सर्व देवांचे शासन करीन; मी परमेश्वर आहे. निर्गम १२:१२

“मी मारून टाकीन... आणि शासन करीन... मी परमेश्वर आहे.” या वचनावरून हे स्पष्ट होते की दहावि पीडा म्हणजे मिसरामधील प्रथम जन्मलेल्यांचा संहार

हा परमेश्वराचा न्याय होता. हे वचन असे दाखवते की परमेश्वर स्वतः, थेट, मिसरमधील सर्व प्रथम जन्मलेल्यांचा नाश करील. पण त्याच अध्यायातील वचन २३ आपण वाचू या

कारण परमेश्वर मिसऱ्यांचा वध करण्यासाठी देशातून फिरणार आहे; ज्या ज्या घराच्या कपाळपट्टीवर व दोन्ही बाह्यांवर रक्त लावलेले परमेश्वर पाहील ते ते दार तो ओलांडून जाईल आणि नाश करणाऱ्याला तुमचा नाश करण्यासाठी तुमच्या घरात शिरू देणार नाही. निर्गम १२:२३

येथे मात्र एक अगदी वेगळीच गोष्ट दिसते. म्हणजे, प्रथम जन्मलेल्यांचा नाश स्वतः परमेश्वराने आपल्या हाताने केला नाही, तर एका व्यक्तीने केला जो “नाश करणारा” म्हणून ओळखला जातो. तो कोण आहे? आपल्याला संहारकाबद्दल आणखी एक उल्लेख १ करिंथकरांस १०:१० मध्ये सापडतो

त्यांच्यापैकी कित्येकांनी कुरकुर केली आणि ते संहारकर्त्याकडून नाश पावले, तेव्हा तुम्ही कुरकुर करू नका. १ करिंथकरांस १०:१०

“संहारक” या शब्दाचा ग्रीक भाषेतला अर्थ असा आहे G3645: एक नाश करणारा, विशेषतः विषारी सर्प; म्हणजे संहारक.

हा संदर्भ इस्राएली लोक वाळवंटात असताना घडलेल्या घटनांचा आहे, जिथे काही लोकांचा संहार संहारकाने केला. तरीही या वचनावरून स्पष्टपणे समजत नाही की हा संहारक नेमका कोण आहे. बहुतेक लोक असे मानतात की तो परमेश्वरच तो आहे, कारण ते म्हणतात की परमेश्वरच वाळवंटातील लोकांना शिक्षा देत होता. पण निर्गम १२:२३ मध्ये आपण पाहतो की तो परमेश्वर असू शकत नाही. कारण परमेश्वरच तो आहे जो संहारकाला नाश करण्यास परवानगी देतो किंवा त्याला थांबवतो.

आपल्याला संहारकाचा आणखी एक उल्लेख प्रकटीकरण ९:११ मध्येही आढळतो…

अथांग डोहाचा दूत हा त्यांच्यावर राजा आहे; इब्री भाषेतील त्यांचे नाव

अबद्दोन, आणि हेल्लेणी भाषेतील त्याचे नाव अपल्लूओन आहे. प्रकटीकरण ९:११

"अबद्दोन" किंवा "अपल्लूओन" या शब्दाचा अर्थ आहे "संहारक". त्यामुळे अथांग खड्ड्यातला हा देवदूत म्हणजेच संहारक आहे. तो कोण आहे? बायबल स्वतःच त्याचे स्पष्टीकरण देते.

"पाचव्या देवदूताने कर्णा वाजवला, तेव्हा एक तारा आकाशातून पृथ्वीवर पडलेला मला दिसला; त्याच्याजवळ अथांग डोहाची किल्ली देण्यात आली." प्रकटीकरण ९:१

हा स्वर्गातून पृथ्वीवर पडलेला तारा कोण आहे हे स्पष्ट आहे. तो म्हणजे सैतान. सैतानच संहारक आहे!

एलेन व्हाईटही बायबलमध्ये आपल्याला जे सापडते तेच निश्चित करते. ती म्हणते की पवित्र शास्त्रात सैतानालाच संहारक म्हटले गेले आहे:

"सैतान हा देव आणि मनुष्याचा मोठा शत्रू आहे. तो आपल्या कार्यकर्त्यांद्वारे स्वतःला प्रकाशाच्या देवदूतामध्ये बदलतो. पवित्र शास्त्रात त्याला संहारक, बंधुभगिनींवर दोष ठेवणारा, फसवणूक करणारा, खोटारडा, यातना देणारा आणि खून करणारा म्हटले गेले आहे." (५T १३७)

"सैतान हा संहारक आहे." (Banner, १ मार्च १९०५)

याच्या उलट आपण पाहतो की येशू नाशाविषयी काय सांगतो.

लूक ९:५६ "कारण मनुष्याचा पुत्र लोकांचा जीव नाश करण्यासाठी आला नाही, तर वाचविण्यासाठी आला आहे."

मानवस्वरूप धारण करताना ख्रिस्ताने असा स्वभाव प्रकट केला, जो सैतानाच्या स्वभावाच्या अगदी उलट होता. (DA 25)

सैतान हा संहारक आहे, पण ख्रिस्त हा पुनर्स्थापक आहे. (RH, २६ नोव्हेंबर

१८९५)

जर ख्रिस्ताने सैतानाच्या उलट स्वभाव प्रकट केला असेल, तर कधी त्याने सैतानासारखा स्वभाव प्रकट करून लोकांचा नाश केला आहे काय? ख्रिस्ताच्या कार्यात कुठल्याही ठिकाणी त्याने शिकवले आहे का की तो लोकांचा नाश करण्यासाठी आला आहे?

तो तर माणसाला उचलण्यासाठी आला होता. ज्याने ख्रिस्तावर स्वतःच्या वैयक्तिक तारणाऱ्यासारखा विश्वास ठेवावा तो वाचावला जाईल, अशी तरतूद केली गेली होती. त्याच्या प्रत्येक कार्यात त्याने लोकांना शिकवले की त्याचे ध्येय लोकांचा जिवाचा नाश करणे नव्हते, तर त्यांना वाचविणे होते. {ST, २ जुलै, १८९६, पॅरा. ३}

ख्रिस्ताच्या सर्व कार्यांमध्ये त्याने लोकांना शिकवले की लोकांचा नाश करणे हे त्याचे कार्य नव्हते. त्याचे ध्येय होते पित्याला प्रकट करणे तारण, मुक्ती आणि उद्धार यांद्वारे.

ख्रिस्त जगात हरवलेल्यांना शोधण्यासाठी व त्यांचे रक्षण करण्यासाठी आला होता. जेव्हा परूशी लोकांनी त्याच्यावर कर गोळा करणाऱ्यांबरोबर व पाप्यांबरोबर जेवतो असा आरोप केला, तेव्हा त्याने उत्तर दिले "मी धर्मी (स्वतःला धर्मी समजणाऱ्या) लोकांना नव्हे, तर पाप्यांना मनपरिवर्तनासाठी बोलविण्यास आलो आहे." तो वाचविण्यासाठी आला होता, नाश करण्यासाठी नव्हे. आत्मे त्याच्या दृष्टीने फार मौल्यवान आहेत; कारण निर्मितीमुळे आणि तारणामुळे त्या त्याच्या आहेत. (MM 183)

परमेश्वर वाचवू इच्छितो, नाश करू पाहत नाही. पाप्यांचे उद्धार करण्यात त्याला आनंद आहे. "जसा मी जिवंत आहे तसा परमेश्वर देव म्हणतो मला दुष्टाच्या मृत्यूत आनंद नाही." (यहेज्केल ३३:११) तो इशारे देतो आणि विनवतो की लोकांनी आपला वाईट मार्ग सोडावा, त्याच्याकडे वळावे आणि जगावे. तो आपल्या निवडलेल्या दूतांना पवित्र धैर्य देतो, जेणेकरून ऐकणारे भयभीत

होतील आणि पश्चात्ताप करतील. (PK १०४,१०५)

नाश करणे हा दैवी स्वभावाचा भाग नाही; पुनर्स्थापित करणे हा त्याचा स्वभाव आहे.

तारण हे देवाच्या स्वभावाचा एक भाग आहे. देवाचा विशेषाधिकार म्हणजे पुन्हा उभारणे आहे, नाश करणे नव्हे. देवपुत्र जगाची पायाभरणी करण्यापूर्वीच मरण्यासाठी दिला गेला होता. पापाचे अस्तित्व अगम्य आहे; त्यामुळे देव कोण आहे हे कुणालाही कळत नाही, जोवर तो स्वतःला कालवरीच्या वधस्तंभावरून पडणाऱ्या प्रकाशात पाहत नाही आणि आपल्या आत्म्याच्या कडवटपणात स्वतःला पापी म्हणून तुच्छ मानत नाही. (TM २६४, २६५)

हाच स्वभाव देवदूतांमध्ये आहे. ते स्वर्गातून लोकांचा नाश करण्यासाठी पाठविले जात नाहीत, तर ते लोकांना वाचविण्यासाठी पाठविले जातात.

देवदूत स्वर्गीय दरबारातून पाठविले जातात नाश करण्यासाठी नव्हे, तर धोक्यात आलेल्या आत्म्यांवर लक्ष ठेवण्यासाठी, त्यांचे रक्षण करण्यासाठी, हरवलेल्यांना वाचविण्यासाठी, आणि भटकणाऱ्यांना पुन्हा कळपात आणण्यासाठी. “मी दोष लावण्यासाठी आलो नाही, तर वाचविण्यास आलो आहे,” असे ख्रिस्ताने सांगितले. मग, भटकणाऱ्यांशी बोलण्यासाठी तुझ्याकडे करुणामय शब्द नाहीत काय? तू त्यांना नाश होऊ देशील, की त्यांच्याकडे मदतीचा हात पुढे करशील? RH, १० मे, १९०६

मग हे स्पष्ट आहे की मिसरमध्ये “पाठविले गेलेले” वाईट देवदूत कोण होते. ते म्हणजे सैतान आणि त्याचे सहकारी होते, ज्यांनी मिसरमधील सर्व प्रथम जन्मलेल्यांचा नाश केला.

स्तोत्र ७८:४९ मध्ये “पाठविणे” या हिब्रू शब्दाचा अर्थ आहे मोकळे करणे किंवा सोडून देणे होतो.

आता, कदाचित काही जण आक्षेप घेतील की मी देव आणि सैतानाला सहकारी आणि मित्र म्हणून दाखविले, जणू सैतान देवाच्या योजनेची पूर्तता करतो.

नाही, मी कोणत्याही परिस्थितीत असे केलेले नाही.

देव आणि सैतान मित्र नाहीत. सत्य हे आहे की सैतान हा संहारक आहे जो नेहमीच देवाच्या विशेष संरक्षणाखाली नसलेल्यांचा नाश करण्यासाठी वाट पाहत असतो. मिसरमध्ये, ते सर्व जेष्ट पुत्र होते. जर देवाच्या सामर्थ्याने इतरांचे रक्षण झाले नसते, तर सैतानाने सर्व मिसरी लोकांचा नाश केला असता. एलेन व्हाईट संहारकाच्या नाश करण्याच्या अधीरतेबद्दल असे सांगते:

“तो महापातकी स्वतःच्या गुणांनी सृष्टीकर्ता व मानवाचा उपकारकर्ता यांना झाकतो. क्रूरता ही सैतानी आहे. देव म्हणजे प्रेम आहे; आणि त्याने जे काही निर्माण केले ते सर्व शुद्ध, पवित्र आणि सुंदर होते, जोपर्यंत पहिल्या महान बंडखोराने पाप आणले नव्हते. सैतानच माणसाला पाप करण्यास प्रवृत्त करणारा शत्रू आहे, आणि मग शक्य असेल तर त्याचा नाश करणारा आहे; आणि जेव्हा तो आपल्या बळीला पकडतो, तेव्हा त्याने केलेल्या विध्वंसात तो आनंद मानतो. जर त्याला परवानगी मिळाली असती, तर त्याने संपूर्ण मानवजातीला आपल्या जाळ्यात ओढून घेतले असते. जर दैवी सामर्थ्याचा हस्तक्षेप झाला नसता, तर आदामाची एकही कन्या वा पुत्र सुटला नसता.” {GC 534.2}

“लुसिफर त्याच्यावर स्वर्गाने सोपविलेल्यांचा संहारक झाला.” (AUCR, १ ऑक्टोबर, १९०६)

बहिण व्हाईट देवाच्या शेवटच्या न्यायांचे वर्णन करताना असे सुचवते की मिसरमधील न्याय हि त्या दिवसाची सावली होती, आणि ती म्हणते:

“जेव्हा संहारक देवदूत मिसरमधून जाणार होता, माणसांचे आणि जनावरांचे जेष्ट पुत्र नष्ट करण्यासाठी, तेव्हा इस्राएल लोकांना आज्ञा दिली गेली की त्यांनी आपली मुले व कुटुंबे आपल्याबरोबर घरात जमवावी, आणि दाराच्या चौकटींवर रक्ताची खूण करावी, जेणेकरून संहारक देवदूत त्यांच्या घराजवळून पुढे जाईल; आणि जर त्यांनी हे केले नाही, तर त्यांच्यात व मिसरी लोकांमध्ये काहीही फरक ठेवला गेला नाही.

संहारक देवदूत पुन्हा बाहेर जाणार आहे, फक्त प्रथम जन्मलेल्यांचा नाश करण्यासाठी नव्हे, तर “वयस्कर-तरुण, पुरुष-स्त्रिया आणि लहान मुले” ज्यांच्यावर खूण नाही त्यांचा संपूर्ण वध करण्यासाठी. आईवडिलांनो, जर तुम्हाला तुमची मुले वाचवायची असतील, तर त्यांना जगापासून वेगळे करा…” (RH, १४ ऑक्टोबर, १८७५)

मग “वयस्कर आणि तरुण, पुरुष, स्त्रिया आणि मुले यांचा संपूर्ण वध करा” या आज्ञेने काय दर्शविले आहे? ही म्हणजे यहेज्केल ९ मधली आज्ञा आणि त्या वधाची शस्त्रे असलेल्या पुरुषांचे प्रतिनिधित्व आहे.

यहेज्केल 9:2-6 तेव्हा पाहा, उत्तरेकडील वरच्या वेशीने सहा पुरुष आपल्या हाती विध्वंसक हत्यारे घेऊन आले; त्यांच्यामध्ये शुभ्र तागाचे वस्त्र ल्यालेला एक मनुष्य होता; त्याच्या कंबरेनजीक कारकुनाची दऊत होती. ते आत जाऊन पितळी वेदीजवळ उभे राहिले. करूबारूढ असलेल्या इस्राएलाच्या देवाचे तेज तेथून निघून मंदिराच्या उंबरठ्यावर आले; आणि कंबरेनजीक कारकुनाची दऊत असलेल्या व शुभ्र तागाचे वस्त्र ल्यालेल्या त्या मनुष्यास त्याने हाक मारली. परमेश्वर त्याला म्हणाला, “नगरामधून, यरुशलेमेमधून जाऊन जी माणसे आपल्यात होत असलेल्या सर्व अमंगळ कृत्यांमुळे उसासे टाकून विलाप करीत आहेत त्यांच्या कपाळावर चिन्ह कर.” मला ऐकू येईलसे तो त्या बाकीच्यांना म्हणाला, “त्याच्यामागून नगरात जा व संहार करा; कृपादृष्टी करू नका; गय करू नका, वृद्ध, तरुण व कुमारी, मुले व स्त्रिया ह्यांची निखालस कत्तल करा; पण ज्यांच्यावर चिन्ह असेल त्यांना स्पर्श करू नका; माझ्या पवित्रस्थानापासून आरंभ करा.” तेव्हा मंदिरापुढे असलेल्या वडिलांपासून त्यांनी आरंभ केला.

तरुण असो वा वृद्ध, सर्वांचा वध शस्त्रांनी केला जाणे म्हणजे काय?

जर त्यांनी पश्चात्ताप केला नाही, आणि कामाचा भार वाहणाऱ्यांना दडपून ठेवण्यात, तसेच सियोनमध्ये पाप्यांना बळकट करण्याच्या सैतानाच्या कार्यात सहभागी राहिले, तर त्यांना देवाच्या शिक्कामोर्तब केलेल्या मान्यतेची खूण कधीच मिळणार नाही. ते दुष्टांच्या सर्वसामान्य विनाशात पडतील जो वध

करणारे शस्त्रे धरलेल्या पाच पुरुषांच्या कार्याने दर्शविला गेला आहे. {3T 267}

म्हणूनच, त्या पाच पुरुषांचे कार्य जे वधाची शस्त्रे धरून आहेत, त्याचा अर्थ होतो दुष्टांचा सर्वसामान्य विनाश. हा सर्वसामान्य विनाश कसा घडतो? खालील विधाने काळजीपूर्वक पहा:

“मी पाहिले की चार देवदूतांना पृथ्वीवर एक काम करायचे होते, आणि ते दूत ते पूर्ण करण्यासाठी जात होते. येशूने याजकांचे वस्त्र परिधान केलेले होते. त्याने उरलेल्या मंडळींकडे दयाळूपणे पाहिले, आणि मग आपले हात वर उचलून अत्यंत दयाळू आवाजात ओरडला: ‘माझे रक्त, पित्या, माझे रक्त, माझे रक्त, माझे रक्त!’ मग मी पाहिले की देवाकडून, जो महान पांढऱ्या सिंहासनावर बसलेला होता, एक अत्यंत तेजस्वी प्रकाश निघाला, आणि तो सर्वत्र पसरून येशूभोवती झळकत राहिला. मग मी पाहिले की येशूकडून आज्ञा घेऊन एक देवदूत वेगाने उडत आला. तो त्या चार देवदूतांकडे गेला ज्यांना पृथ्वीवर एक काम करायचे होते. त्याने आपल्या हातात काहीतरी वर-खाली हलवले आणि मोठ्या आवाजात ओरडला: ‘थांबा! थांबा! थांबा! थांबा! जोपर्यंत देवाचे सेवक त्यांच्या कपाळावर शिक्कामोर्तब होत नाहीत.’” {EW 38.1}

“मी माझ्या सोबत असलेल्या देवदूताला विचारले की मी जे ऐकले त्याचा अर्थ काय आहे, आणि ते चार देवदूत काय करणार होते. त्याने मला सांगितले की देवच त्या शक्तींना आवर घालतो, आणि त्याने आपल्या देवदूतांना पृथ्वीवरील गोष्टींची जबाबदारी दिली आहे. त्या चार देवदूतांना देवाकडून चार वारे धरून ठेवण्याचा अधिकार मिळाला होता, आणि ते ते सोडण्याच्या बेतात होते. पण जेव्हा त्यांच्या हातांनी सैल होणे सुरू केले, आणि चार वारे सुटणार होते, तेव्हाच येशूच्या दयाळू नजरेने त्याने उरलेल्या लोकांकडे पाहिले जे अजून शिक्कामोर्तब झाले नव्हते. त्याने आपले हात पित्याकडे उचलले आणि विनवणी केली की त्याने त्यांच्यासाठी आपले रक्त सांडले आहे. मग आणखी एका देवदूताला वेगाने त्या चार देवदूतांकडे उडण्यासाठी आज्ञा दिली गेली, आणि त्यांना सांगण्यासाठी की: ‘थांबा!’ जोपर्यंत देवाचे सेवक त्यांच्या कपाळावर जिवंत

देवाच्या शिक्क्याने शिक्कामोर्तब होत नाहीत." {EW 38.2}

आपण पाहतो की देवाचे देवदूत वाईटाच्या शक्तींना आवर घालतात, जोवर देवाचे सेवक शिक्कामोर्तब होत नाहीत. जेव्हा हे काम पूर्ण होते आणि येशू पवित्रस्थान सोडतो, तेव्हा वारे मोकळे होतात आणि मग सैतानाला संपूर्ण नियंत्रण दिले जाते, जेणेकरून तो जगाला एका महान क्लेशकाळात ढकलतो जो यरुशलेमच्या विनाशाच्या पद्धतीप्रमाणेच असेल:

"जेव्हा तो पवित्रस्थान सोडतो, तेव्हा पृथ्वीवरील रहिवाशांवर अंधार पसरतो. त्या भयंकर काळात धर्मी लोकांना कोणत्याही मध्यस्थाशिवाय पवित्र देवाच्या दृष्टीपुढे जगावे लागते. जे बंधन दुष्टांवर होते ते काढून टाकले जाते, आणि अखेरीस हट्टी झालेल्या लोकांवर सैतानाचे पूर्ण नियंत्रण होते. देवाचा दीर्घश्वास संपतो. जगाने त्याच्या दयेला नाकारले आहे, त्याच्या प्रेमाचा तिरस्कार केला आहे, आणि त्याच्या नियमांना तुडवले आहे. दुष्टांनी आपल्या संधीची मर्यादा ओलांडली आहे; देवाचा आत्मा, ज्याला सतत विरोध करण्यात आला, अखेरीस मागे घेतला गेला आहे. दैवी कृपेच्या आडोश्याशिवाय, त्यांना वाईटापासून काहीही संरक्षण नाही. मग सैतान पृथ्वीवरील रहिवाशांना एका महान, अंतिम संकटात ढकलतो. जेव्हा देवाचे देवदूत मानवी वासनांचे प्रचंड वारे आवर घालणे थांबवतात, तेव्हा सर्व कलहाचे घटक मोकळे सोडले जातात. संपूर्ण जग एका अशा विध्वंसात अडकते, जो प्राचीन काळी यरुशलेमवर आला होता आणि त्यापेक्षाही अधिक भयंकर असेल." {GC 614.1}

म्हणूनच, तोच संहारक देवदूत जो मिसरमधून गेला आणि ज्याने जेष्ठ पुत्रांचा नाश केला, तो पुन्हा जाणार आहे पण यावेळी देवाची खूण नसलेल्यांचा नाश करण्यासाठी.

पुन्हा आपण विचारतो: हा संहारक देवदूत कोण आहे? आपण आधी सांगितले आहे की तो सैतान आहे. पण या दाव्याला आणखी पुरावे आहेत काय? उत्तर असे आहे:

"ज्या आधी मिसरमध्ये जेष्ठ पुत्रांचा वध झाला, त्याआधी परमेश्वराने इस्राएल

लोकांना आज्ञा दिली की त्यांनी आपली मुले आपल्याबरोबर घरांत जमवावी, आणि दाराच्या चौकटी व वरच्या कपाटावर रक्ताचा लेप करावा; जेणेकरून जेव्हा संहारक देवदूत देशभरून जाईल, तेव्हा तो खूण केलेली घरे ख्रिस्ताचे अनुयायी राहतात असे ओळखेल, आणि त्यांना ओलांडून पुढे जाईल.

आज, जर आपल्याला आपल्या मुलांना त्या दुष्टाच्या नाशक शक्तीपासून वाचवायचे असेल, तर आपण त्यांना आपल्या सभोवती गोळा केले पाहिजे. ख्रिस्त आणि सैतान यांच्यातील संघर्ष या जगाच्या इतिहासाच्या शेवटपर्यंत अधिकाधिक तीव्र होईल. आपल्याला ख्रिस्ताच्या रक्तावर विश्वास ठेवावा लागेल, जेणेकरून आपणास पुढे असलेल्या धोकादायक काळातून सुरक्षित जाता येईल." {2SAT 199}

मला वाटते हा संदर्भ आपले सर्व शंका दूर करतो. एकच आहे जो वाईट आहे, आणि जो सुरुवातीपासून संहारक आहे तो म्हणजे सैतान!

येशू दार ठोठावतो; तू त्याच्यासाठी दार उघडशील काय? कि त्याला तुझ्या दाराच्या कपाटावर आणि चौकटीवर, सर्व पाप शुद्ध करणाऱ्या आपल्या रक्ताऐवजी, असा न्याय लिहिण्यास भाग पडशील ज्यामुळे तुला संहारक देवदूतांच्या ताब्यात सोडले जाईल? "तो आपल्या मूर्तींशी जोडला गेला आहे. संरक्षक देवदूतांनो, त्याला सोडून द्या." [होशे ४:१७] "जशी कोंबडी आपली पिले पंखांखाली एकवटते, तसे तुझ्या मुलांबाळांना एकवटायची कितीदा तरी माझी इच्छा होती, पण तुमची इच्छा नव्हती!" [मत्तय २३:३७] जे लोक दार उघडतील, त्यांच्यात येशू येतो आणि अधिकार घेतो. {LT 30a, 1892}

पण जे त्याच्या पूर्ण संरक्षणाखाली यायला नकार देतात, त्यांच्याकडून येशू दुःखाने माघार घेतो. मग ते संहारकाच्या ताब्यात सोडले जातात. तरी काही संदर्भ असे दिसतात की ते जणू देवाच्या देवदूताबद्दल बोलतात. आपण या संदर्भाचे काय करू?

"...देवाचा देवदूत देशातून जाणार होता, आपले भयंकर कार्य करीत मनुष्यांचे जेष्ठ पुत्र आणि जनावरांचे जेष्ठ पुत्रांना ठार मारत होता." {1SP 199}

मग, आपण हा संदर्भ घ्यायचा आणि आत्तापर्यंतचा आपला सर्व अभ्यास टाकून द्यायचा काय? सर्व तथ्यांचा विचार करून हे सोडविण्याचे दोन मार्ग आहेत:

१. पाडले गेलेले देवदूतसुद्धा "देवाचे देवदूत" म्हणून ओळखले जाऊ शकतात. कारण देव जबाबदारी घेतो. त्या वचनांकडे बघा जिथे लिहिले आहे की देव "वाईट आत्मे पाठवतो."

शास्ते ९:२३ "त्यानंतर देवाने अबीमलेख व शखेमकर ह्यांच्यामध्ये वैमनस्य उत्पन्न करणारा दुरात्मा पाठवला आणि शखेमकर अबीमलेखाशी कपटाने वागू लागले."

१ शमुवेल १६:२३ "जेव्हा जेव्हा देवाकडील दुरात्म्याची शौलाला बाधा होई तेव्हा तेव्हा दावीद वीणा घेऊन आपल्या हाताने वाजवीत असे; मग शौलाला चैन पडून बरे वाटत असे, व तो दुरात्मा त्याला सोडून जात असे.

१ राजे २२:२३ "तर पाहा, परमेश्वराने तुझ्या ह्या सर्व संदेष्ट्यांच्या मुखात असत्य वदवणारा आत्मा संचरवला आहे; तुझे अनिष्ट होणार असे परमेश्वर बोलला आहे."

आपण हे असा समजायचे का की देव थेट हे करतो आहे? की तो थेट वाईट देवदूतांबरोबर काम करतो आहे? ॲडम क्लार्क आपल्या या शेवटच्या वचनावरच्या टीकाटिप्पणीमध्ये हे स्पष्टपणे सांगतात कि

"त्याने (देवाने) खोट्या आत्म्याला तुझ्या संदेष्ट्यांवर प्रभाव टाकण्याची परवानगी दिली आहे किंवा ते घडू दिले आहे. वाचकाला पुन्हा स्मरण करून द्यावे लागेल का की पवित्र शास्त्र वारंवार देव असे करतो असे सांगते, जे प्रत्यक्षात त्याच्या संचालनात तो फक्त परवानगी देतो किंवा होऊ देतो? स्वर्गात, पृथ्वीवर किंवा अधोलोकात काहीही घडू शकत नाही, जे त्याच्या थेट सामर्थ्याने किंवा त्याच्या परवानगीशिवाय घडेल. हीच कारणे आहेत की पवित्र शास्त्र अशा रीतीने बोलते." (ॲडम क्लार्क, १ राजे २२:२३ वरील टीका)

आपण हेही लक्षात ठेवतो की स्तोत्र ७८:४९ मध्ये, मिसरमधून बाहेर

पडण्याबद्दल बोलताना असे लिहिले आहे:

“त्याने (देवाने) आपला प्रखर कोप, संताप, राग आणि संकट त्यांच्यावर टाकले, वाईट देवदूतांना त्यांच्यात पाठवून (हिब्रूमध्ये याचा अर्थ ‘मोकळे करणे’ असाही होतो).”

२. दुसरा पर्याय असा आहे की इथे उल्लेख केलेला “देवाचा देवदूत” म्हणजे तो देवदूत आहे जो संरक्षक देवदूतांना बाजूला होण्याची आज्ञा देतो. या प्रसंगात हा देवदूत प्रत्येक घराकडे जाईल, पाहील की तिथे वलांडणाचे रक्त आहे का, आणि मग त्या घराच्या संरक्षक देवदूताला संरक्षण थांबवण्यास सांगेल. त्यानंतर सैतानाला हवे तसे करण्याची ताकद मिळेल. आपण वाचकाला पुन्हा त्या आधी उल्लेख केलेल्या वचनाची आठवण करून देतो:

“त्याला आपल्या रक्ताऐवजी, जे सर्व पापांपासून शुद्ध करते, दाराच्या चौकटीवर असा न्याय लिहिण्यास भाग पडेल की ज्यामुळे तुला संहारक देवदूतांच्या ताब्यात सोडले जाईल? ‘तो आपल्या मूर्तींशी जोडला गेला आहे.’ संरक्षक देवदूतांनो, ‘त्याला सोडून द्या.’” {LT 30a, 1892}

यावरून स्पष्ट होते की हा पवित्र देवदूत थेट हत्या करीत नव्हता. याचा आणखी पुरावा Spirit of Prophecy खंड 1 मध्ये पुढे मिळतो, जिथे “देवाच्या देवदूताबद्दल” असे लिहिलेले आहे:

“दाराच्या चौकटीवर फासलेले रक्त हे ख्रिस्ताच्या प्रायश्चित्ताच्या रक्ताचे प्रतिरूप होते, तसेच पापी मनुष्याच्या ख्रिस्ताच्या रक्ताच्या गुणांवर सतत अवलंबून राहण्याचे प्रतीक होते जेणेकरून तो सैतानाच्या सामर्थ्यापासून सुरक्षित राहील, आणि त्याला अंतिम तारण मिळेल.” {1SP 201.1}

म्हणजे त्याच अध्यायात बहिण एलेन व्हाईट असे सांगते की दाराच्या चौकटीवरील रक्त, जे ख्रिस्ताच्या रक्ताचे प्रतीक होते, लोकांना “सैतानाच्या सामर्थ्यापासून” वाचवत होते. जर खरोखरच पवित्र देवदूत मुलांचा वध करत असतील, तर मग ख्रिस्ताचे रक्त हे “सैतानाच्या सामर्थ्यापासून” नव्हे, तर “देवाच्या सामर्थ्यापासून” वाचवत होते.

असे दिसते की एलेन व्हाईटने बायबलमध्ये वापरलेलीच भाषा वापरली होती, पण नंतरच्या तिच्या लेखनांमध्ये Spirit of Prophecy खंड 1 लिहिल्यापेक्षा अधिक स्पष्टपणे काय घडते हे सांगितले. देवाने मजकुरात जाणीवपूर्वक काही अस्पष्टता राहू दिली आहे, जेणेकरून आपण खोलवर अभ्यास करू.

संरक्षण काढून घेण्याची आणि त्यानंतर होणाऱ्या विध्वंसाची संपूर्ण प्रक्रिया “महान संघर्ष” (Great Controversy) च्या पहिल्या अध्यायात यरुशलेमचा विनाश यामध्ये तपशीलवार मांडलेली आहे. भविष्यवाणीचा आत्मा (Spirit of Prophecy) यरुशलेमच्या विनाशाचे आणि ख्रिस्ताने म्हटलेल्या या वचनाचे एकत्र उदाहरण दाखवतो: “तुमचे घर तुम्हांस ओसाड सोडले गेले आहे.” हे साम्य महत्त्वाचे आहे, कारण ते आपल्याला मिसरमध्ये काय घडले याबद्दल आणखी संकेत देते.

यहूद्यांनी स्वतःच आपल्यासाठी बेड्या तयार केल्या होत्या; त्यांनी स्वतःच सूडाचा प्याला भरून घेतला होता. जेव्हा त्यांच्यावर राष्ट्र म्हणून संपूर्ण विनाश आला, आणि ते विखुरल्यामुळे त्यांनी जी सारी दुःखे भोगली, ती प्रत्यक्षात त्यांच्या स्वतःच्या हातांनी पेरलेल्या पिकाची कापणी होती. संदेष्टया म्हणतो: “हे इस्राएला, तू स्वतःचा नाश केला आहेस”; “कारण तू आपल्या अधर्मामुळे पडला आहेस.” (होशे १३:९; १४:१) त्यांच्या दुःखांना अनेकदा अशा प्रकारे दाखवले जाते की जणू त्या देवाच्या थेट आज्ञेने आलेल्या शिक्षा आहेत. आणि हाच तो मार्ग आहे ज्याद्वारे महान फसवणूक करणारा (सैतान) स्वतःचे कार्य लपवायचा प्रयत्न करतो. दैवी प्रेम आणि दयेचा हट्टाने नकार देऊन यहूद्यांनी देवाचे संरक्षण स्वतःवरून दूर केले होते, आणि मग सैतानाला त्यांना आपल्या इच्छेनुसार राज्य करण्याची परवानगी मिळाली. यरुशलेमच्या विनाशात जे भयंकर अत्याचार झाले, ते सैतानाचे सूडाने भरलेले सामर्थ्य किती भयंकर आहे हे स्पष्टपणे दाखवतात विशेषतः त्यांच्यावर जे स्वतःला त्याच्या नियंत्रणाखाली सोडतात. {GC 35.3}

मिसरमधला विनाश आणि यरुशलेममधला विनाश दोन्ही एकाच प्रक्रियेतून झाले; त्यांना सैतानाच्या ताब्यात सोडले गेले होते. हाच तो मार्ग आहे ज्याद्वारे

देवाचे न्याय घडतात.

“मला दाखविण्यात आले की देवाचे न्याय थेट परमेश्वराकडून लोकांवर येत नाहीत, पण अशा रीतीने येतात: कि ते स्वतःला त्याच्या संरक्षणापलीकडे ठेवतात. तो इशारे देतो, सुधारतो, फटकारतो, आणि सुरक्षिततेचा एकमेव मार्ग दाखवतो; पण जे लोक त्याच्या विशेष काळजीखाली होते, त्यांनी वारंवार दिलेल्या इशाऱ्यांनंतरही जर देवाच्या आत्म्याशिवाय स्वतःचा मार्ग निवडला, तर मग तो आपल्या देवदूतांना अशी आज्ञा देत नाही की त्यांनी सैतानाचे ठरवून केलेले हल्ले थांबवावेत.” {14MR 3}

आणि पुन्हा एकदा आपल्याला सांगितले जाते:

देव राष्ट्रांबरोबर हिशेब ठेवतो. त्याच्या लक्षात न घेता एकही चिमणी जमिनीवर पडत नाही. जे लोक आपल्या सहकाऱ्यांविरुद्ध वाईट करतात आणि म्हणतात, “देवाला कसे माहीत होणार?” त्यांना एक दिवस खूप काळ पुढे ढकललेला सूड भोगावा लागेल. या युगात देवाविषयी नेहमीपेक्षा अधिक तिरस्कार दाखविला जात आहे. लोक उद्धटपणा आणि अवज्ञेच्या अशा टप्प्यावर आले आहेत, ज्यावरून दिसते की त्यांच्या अधर्माचा प्याला जवळजवळ पूर्ण भरला आहे. बरेच जण दयेच्या सीमारेषेपलीकडे जवळजवळ गेले आहेत. लवकरच देव दाखवेल की तो खरोखरच जिवंत देव आहे. तो आपल्या देवदूतांना म्हणेल: “आता सैतानाच्या नाश करण्याच्या प्रयत्नांना थांबवू नका. त्याला आज्ञाभंग करणाऱ्या मुलांवर आपली दुष्टता ओतू द्या; कारण त्यांच्या अधर्माचा प्याला पूर्ण झाला आहे. त्यांनी दुष्टतेच्या एका पायरीवरून दुसऱ्या पायरीवर प्रगती केली आहे, रोज त्यांच्या अधार्मिकतेत भर घातली आहे. मी आता संहारकाला त्याचे काम करण्यापासून रोखणार नाही.” (RH, १७ सप्टेंबर, १९०१)

फारोचा बी पेरण्याचा काळ होता, आणि कापणीचा काळही होता. त्याने विरोध आणि हट्टीपणा पेरले. त्याने बी जमिनीत टाकले. देवाने कोणतीही नवीन शक्ती चालवली नाही. ते बी अंकुरण्यासाठी सोडले गेले; त्या मनुष्याला त्याचा खरा स्वभाव उघड करण्याची परवानगी दिली गेली. जेव्हा प्रभू पाहतो की पुरावा आणि प्रकाश असूनही मनात अविश्वास आहे, तेव्हा त्याला एवढेच करायचे

असते की त्या मानवाला स्वतःच्या मार्गावर सोडून द्यायचे; कारण जमिनीत पेरलेले बी त्याचप्रकारचे पीक उगवेल. बरेच जण अविश्वासाचे बी पेरत आहेत, आणि जर ते बी जोपासले गेले, तर त्याची कापणी तितकी सुखदायक नसेल, जितकी पेरणी गोड वाटली होती. जेव्हा फारोने देवाच्या संदेशांना आणि इशाऱ्यांना लक्ष दिले नाही, आणि देवाने त्याला पटविण्यासाठी केलेल्या पहिल्या चमत्कारानेही त्याला काही फरक पडला नाही, तेव्हा त्याची अवस्था अशी झाली की तो सहजच म्हणू लागला, “मी करीन” किंवा “मी करणार नाही.” त्याच्या हट्टी विरोधाने त्याचप्रकारचे पीक तयार झाले. देवाने त्याला योग्य मार्गावर नेण्यासाठी दिलेले सर्व पुरावे फक्त त्याला अविश्वास आणि बंडखोरीतच अधिक घट्ट करत गेले. तो एका पायरीवरून दुसऱ्या पायरीवर गेला देवाविरुद्ध विरोध आणि जाणीवपूर्वक अवज्ञेत जसे सर्व युगांतील अधर्मी करीत आले आहेत आणि काळाच्या शेवटपर्यंत करतील. शेवटी त्याने आपल्या जेष्ट पुत्राच्या मृत चेहऱ्याकडे पाहिले. फारोने दाखवलेला स्वभाव हा सर्व हट्टी व पश्चात्ताप न करणाऱ्यांच्या स्वभावासारखाच आहे. देव कोणत्याही मनुष्याचा नाश करीत नाही; परंतु काही काळानंतर दुष्टांना त्या विनाशाच्या हवाली केले जाते, जो त्यांनी स्वतःसाठी तयार केला आहे. {YI, ३० नोव्हेंबर, १८९३, पॅरा. ६}

मिसरचा नाश करण्यासाठी कोणतीही नवी शक्ती आणली गेली नव्हती. मिसरला त्यांच्या स्वतःच्या केलेल्या दुष्ट बंडखोरीच्या हवाली केले गेले. हे खरे आहे की सुरुवातीला देवाने चमत्कार केला साप प्रकट होण्यासाठी जेणेकरून त्यांना दाखवता येईल की सैतानाला नाश करण्याची शक्ती वापरण्यास परवानगी दिली जाईल. पण मिसरावर हे नाशाचे कार्य देवाने केले नव्हते.

प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो, मिसरमध्ये देवाने आज्ञा केली होती की फक्त जेष्ट पुत्रांना संहारकाच्या हाती सोडले जावे. काळाच्या शेवटी तो दुःखाने आज्ञा करेल की जे सुवार्तेच्या शुभवार्तेला आज्ञा मानत नाहीत, त्यांना शत्रूच्या हाती सोडले जावे. जसा येशू यरुशलेमसाठी रडला, तसाच तो आपल्या संपूर्ण जगासाठी रडेल ज्यांनी त्याचा प्रवेश नाकारला आहे.

जसा प्रभू बलिदान दिलेल्या कोकराच्या रक्तामुळे मिसरमधील विश्वासूंच्या

दारात उभा राहिला, तसाच तो पुन्हा उभा राहील त्यांच्या बचावासाठी ज्यांनी आपली वस्त्रे त्या खऱ्या कोकराच्या रक्ताने धुतली आहेत, जे कालवरीवर सांडले.

जे कोणी हे शब्द वाचतात, त्यांना महान संहाराच्या दिवशी संहारकापासून संरक्षण मिळो.

# विध्वंसक

मिसरमधील जेष्ट पुत्रांचा संहारक कोण होता?

निर्गम १२:२३ कारण परमेश्वर मिसऱ्यांचा वध करण्यासाठी देशातून फिरणार आहे; ज्या ज्या घराच्या कपाळपट्टीवर व दोन्ही बाह्यांवर रक्त लावलेले परमेश्वर पाहील ते ते दार तो ओलांडून जाईल आणि नाश करणाऱ्याला तुमचा नाश करण्यासाठी तुमच्या घरात शिरू देणार नाही.

बऱ्याच लोकांचा असा विश्वास आहे की देवानेच त्यांना ठार केले. पण जर देव संहारकाला इस्राएली लोकांच्या घरात शिरू देत नसेल, तर याचा अर्थ काय तो स्वतःलाच थांबवत होता? हे शक्य आहे काय? जर ख्रिस्ताने मिसरमधील जेष्ट पुत्रांचा नाश केला असेल, तर मग याचा अर्थ असा होईल का की जे ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळले गेले आहेत आणि जे विश्वास ठेवतात की ख्रिस्त त्यांच्यात वास करतो, त्यांच्यात एक संहारक वास करतो?

“कारण मनुष्याचा पुत्र लोकांचा जीवाचा नाश करण्यासाठी आला नाही, तर त्यांना वाचविण्यासाठी आला आहे.” (लूक ९:५६)

पुरावे अगदी स्पष्ट दाखवतात की सैतानच संहारक आहे, आणि देवच त्याला त्याचे वाईट कार्य करण्यापासून रोखतो.

“अशा रीतीने तो महापातकी सृष्टीकर्ता आणि मानवाचा उपकारकर्ता यांना स्वतःच्या गुणांनी झाकतो. क्रूरता ही सैतानी आहे. देव हा प्रेम आहे; आणि त्याने जे काही निर्माण केले ते सर्व शुद्ध, पवित्र आणि सुंदर होते, जोवर पहिल्या महान बंडखोराने पाप आणले नव्हते. सैतानच माणसाला पाप करण्यास प्रवृत्त करणारा शत्रू आहे, आणि मग शक्य असेल तर त्याचा नाश करणारा आहे; आणि जेव्हा तो आपल्या बळीला पकडतो, तेव्हा त्याने केलेल्या विध्वंसात तो आनंद मानतो. जर त्याला परवानगी मिळाली असती, तर त्याने संपूर्ण मानवजातीला आपल्या जाळ्यात ओढून घेतले असते. जर दैवी शक्तीने हस्तक्षेप केला नसता, तर आदामाचा एकही पुत्र किंवा कन्या सुटला नसता.” {GC 534.2}